प्रेस नोट

दिनांक :— २१/१२/२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, घटक अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | १) श्री.देविदास रामचंद्र उगले, वय ५६ वर्ष, पद — मंडळ अधिकारी, मंडळ अधिकारी कार्यालय, जुना धामणगाव ता. धामणगाव रेल्वे जि.अमरावती, रा.पेठ नगर, आदर्श कॉलेज जवळ, जुना धामणगाव ता.धामणगाव रेल्वे जि.अमरावती वर्ग—३.<br>२) श्री.राहूल साहेबराव तायडे, वय ३२ वर्षे, पद — कोतवाल, तलाठी कार्यालय, जुना धामणगाव ता.धामणगाव रेल्वे जि. अमरावती रा.अंबादेवी मंदिराजवळ, जुना धामणगाव ता.धामणगाव रेल्वे जि.अमरावती (मानधन तत्वावर) |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | २१/१२/२०२२ चे १७/०२ वा. ते १७/३० वा. दरम्यान |
| ४ | मागणी केलेली रक्कम | ३०,०००/— रूपये. तडजोडीअंती २०,०००/— रूपये. |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | २०,०००/— रूपये. |
| ६ | घटनास्थळ | मंडळ अधिकारी यांचे कार्यालय, जुना धामणगाव ता.धामणगाव रेल्वे जि.अमरावती. |

यातील तक्रारदार यांनी दिनांक २१/१२/२०२२ रोजी तक्रार दिली की, दिनांक २०/१२/२०२२ रोजी धामणगाव चे मंडळ अधिकारी श्री. उगळे यांनी तक्रारदार यांचे ट्रक्टर अडवून, त्यांचे मामा जवळ हद्दीमध्ये मुरुम वाहतूक ट्रक्टर चालू ठेवण्याकरीता तक्रारदार यांना भेटण्याचा निरोप दिला. वरुन तक्रारदार हे मंडळ अधिकारी श्री.उगळे यांना भेटले असता, मंडळ अधिकारी श्री.उगळे यांनी त्यांना हद्दीमध्ये मुरुम वाहतूक ट्रक्टर चालू ठेवण्याकरीता ३०,०००/— रूपये लाचेची मागणी केली. अशी सविस्तर लेखी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दि. २१/१२/२०२२ रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान मंडळ अधिकारी श्री.उगळे यांनी तक्रारदार यांना कोतवाल श्री.तायडे यांचे मार्फतीने त्यांचे हद्दीमध्ये मुरुम वाहतूक ट्रक्टर चालू ठेवण्याकरीता ३०,०००/— रूपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती २०,०००/— रूपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

वरून दिनांक २१/१२/२०२२ रोजी पंचासमक्ष आयोजित सापळा कारवाई दरम्यान आलोसे श्री. देविदास रामचंद्र उगले,मंडळ अधिकारी यांनी कोतवाल श्री.तायडे यांना तक्रारदार यांचेकडून २०,०००/— रूपये लाच रक्कम घेण्यास सांगीतले वरुन कोतवाल श्री.तायडे यांनी सदर ची लाच रक्कम स्विकारुन यातील आलोसे क्र.१ श्री.उगले यांचे जवळ दिली. वरून आज रोजी आलोसे श्री.उगळे व ईलासे श्री. तायडे यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन धामणगाव रेल्वे अमरावती ग्रा. येथे गुन्हा नोंद करण्याची प्रकिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.मारुती ना. जगताप, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.श्री.अरुण सांवत, अपर पोलीस अधीक्षक, मा.श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.श्री.संजय महाजन, पोलीस उप अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, श्री.एस.एस.भगत, पोलीस उप अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.प्रविणकुमार पाटील, पो.नि.केतन मांजरे, पो.ना.युवराज राठोड, पो. ना. राहुल वंजारी, पो.अमलदार वैभव जायले, चालक पो.उप.नि.सतीश किटकूले, यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क: अँन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती.
ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५,२६६४९०२
टोल फ्रि नंबर — १०६४

(प्रविणकुमार पाटील)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
अमरावती.
मो.नं. ९८५००७०५०४